SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR-416 004. MAHARASHTRA
PHONE : EPABX - 2609000 GRAM : UNISHIVAJI
FAX : ००९१-०२३१-२६९१५३३ & ००९१-०२३१-२६९२३३३
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर - ४१६ ००४. महाराष्ट्र
दूरध्वनी (ईपीएबीएक्स) २६०९००० (संलग्नता विभाग - २६०९०८९)
तार : युनिशिवाजी फॅक्स : ००९१-०२३१-२६९१५३३ व २६९२३३३.

B Accredited By
NAAC (2009)

क्र.एसयु/संलग्नता/टे.१/एनएल/ 405 दि. 16 FEB 2012

**प्रति,**
**मा.प्राचार्य**
**संलग्न कला, वाणिज्य, विज्ञान, शारीरिक शिक्षण,**
**शिक्षणशास्त्र, विधी महाविद्यालये,**

**विषय:- पूर्णवेळ/अर्धवेळ महाविद्यालयीन शिक्षकांच्या वरिष्ठ व निवड श्रेणीत स्थाननिश्चितीबाबत.**

महोदय,

उपरोक्त विषय संदर्भात आपणांस आदेशानुसार कळविण्यात येते की, अनुदानित महाविद्यालयीन शिक्षकांची पाचव्या वेतन आयोगानुसार वरिष्ठ/निवड श्रेणीत केंद्रीय पध्दतीने स्थाननिश्चिती करण्यासाठी विद्यापीठातर्फे शिबीर आयोजित करण्यात येणार आहे. तेव्हा आपल्या महाविद्यालयातील जे शिक्षक स्थाननिश्चितीसाठी पात्र होतात त्यांची माहिती सोबत जोडलेल्या प्रपत्रात भरुन दि.~~२५~~ २९ फेब्रुवारी, २०१२ पूर्वी या कार्यालयाकडे पाठवावी.

तसेच एका शिक्षकांच्या प्रस्तावासाठी रु.३००/- (रुपये तीनशे फक्त) इतक्या शुल्काप्रमाणे होणाऱ्या रक्कमेचा डिमांड ड्राफ्ट (कोल्हापूर रोखीकरण होणारा) वित्त व लेखाधिकारी, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांचे नांवे A.२ R.११ या अंदाजपत्रकीय शिर्षकाखाती जमा करण्यासाठी विद्यापीठास पाठवावा. शिक्षकांच्या स्थाननिश्चितीसाठी बैठकीची तारीख महाविद्यालयास नंतर कळविण्यात येईल.

तसेच सदरचे पत्र आपल्या महाविद्यालयातील सर्व संबंधित शिक्षकांच्या निदर्शनास आणावे, ही विनंती.

कळावे,

आपला विश्वासू
संचालक
महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ

सोबत :- वरीलप्रमाणे.

Statement showing the information regarding date of appointment, year of respect of lecturers for Placement Committee. 2009-10

| Sr. no. | Name | Subject | Qualification | Date of appointment in the college[University selection] | date of confirmation | Date of NET/SET M.Phil/ Ph.D. award | Details of orientation/ Refresher cources [Date] | Breake if any | Date on which qualified for Rs. 3000-5000/10000-15200 | Date on which qualified for Rs. 3700-5700/ 12000-18300 | Remarks if any |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. | | | | | | | | | | | |
| 2. | | | | | | | | | | | |
| 3. | | | | | | | | | | | |
| 4. | | | | | | | | | | | |
| 5. | | | | | | | | | | | |
| 6. | | | | | | | | | | | |
| 7. | | | | | | | | | | | |
| 8. | | | | | | | | | | | |

Principa

Place :

Date :

**<u>महाविद्यालयीन शिक्षकांची वरिष्ठ/निवड श्रेणीसाठी आवश्यक बाबी खालीलप्रमाणे.</u>**

शासन निर्णय क्र.एनजीसी-१२९८/(४६१०)/युएन-४ दि.११/१२/१९९९ ला अनुसरून मा.कुलगुरूंनी महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ कलम १४(८) अन्वये दि.०७/०१/२००० रोजी काढलेल्या आदेशात परिच्छेद क्र. १२, १३, १४ व १६ मध्ये खालील तरतुदी नमूद केलेल्या आहेत.

| **आवश्यक बाबी** | **वरिष्ठ श्रेणी** | **निवड श्रेणी** |
|---|---|---|
| सेवा कालावधी | ६ वर्षे | ११ वर्षे |
| पीएच.डी. पदवी संपादन केली असल्यास | ४ वर्षे | ९ वर्षे |
| एम.फिल. पदवी संपादन केली असल्यास | ५ वर्षे | १० वर्षे |
| उद्‌बोधन वर्ग | १ वर्ग (३ ते ४ आठवडे कालावधीतील) | -- |
| उजळणी वर्ग | १ वर्ग (३ ते ४ आठवडे कालावधीतील) | २ वर्ग (३ ते ४ आठवडे कालावधीतील) |
| पीएच.डी. पदवी संपादन केली असल्यास १. एका उजळणी वर्गातून सूट देण्यात यावी | | |
| सेल्फ ॲप्रायजल रिपोर्ट | लगतच्या तीन वर्षातील सातत्याने चांगले असावेत. | लगतच्या तीन वर्षातील सातत्याने चांगले असावेत. |

उजळणी वर्गासंबंधित (Refresher Course) समकक्षता विद्यापीठ अनुदान आयोगाचे पत्र क्र. D.O. No. F.1-6/90 (ASC) सप्टेंबर १९९३ प्रमाणे राहील.

जे शिक्षक नेमणूकीनंतर नेट/सेट परीक्षा पास झाले असतील त्या तारखेनंतरचीच त्यांची सेवा स्थाननिश्चितीसाठी लक्षात घ्यावी.

ज्या शिक्षकांच्या सेवेत १८० दिवस अथवा त्यापेक्षा कमी कालावधीचा सेवाखंड असेल अशा शिक्षकांचा संबंधित सेवाखंड रीतसर क्षमापित केलेला असेल तर सेवाखंडाचा कालावधी वगळून त्या पूर्वीची व नंतरची सेवा स्थाननिश्चितीसाठी लक्षात घ्यावी.

१८० दिवसापेक्षा जास्त सेवाखंड असेल, जरी असा सेवाखंड क्षमापित केला असता तरी सेवाखंडानंतरचीच शिक्षकाची सेवा लक्षात घ्यावी.

प्रत्येक शिक्षकाच्या प्रकरणासाठी शुल्क रू.३००.०० (रू.तीनशे फक्त) प्रमाणे होणाऱ्या रकमेचा डिमांड ड्राफ्ट (कोल्हापुर रोखीकरण होणारा) **"वित्त व लेखाधिकारी, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर"** यांच्या नावे A-२ R-११ या अंदाजपत्रकीय शिर्षकाखाती जमा करण्यासाठी विद्यापीठास पाठवावा. बैठकीची तारीख महाविद्यालयास नंतर कळविण्यात येईल.